**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १३/२०१९** **दिनांक १२/०२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०६/०२/२०१९ ते १२/०२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १३/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून १७/०२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ | ११/०२ | १२/०२ | | १३/०२ | १४/०२ | १५/०२ | १६/०२ | १७/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.६ | २८.० | २६.८ | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३४ | ३२ | ३१ |
| १७.४ | १५.२ | १३.६ | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | १७ | १६ | १७ | १७ | १७ |
| ० | ० | ० | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | १ | ० | ० | ० |
| ९४ | ८८ | ५७ | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ३३ | ५० | ५८ | ५७ | ४३ |
| ४४ | ४७ | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २४ | २६ | २९ | २८ | १८ |
| २.४ | २.८ | ३.८ | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ४ | ४ | ६ | ५ |
| शांत | आ.द. | नै. | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | ई.ऊ. | ई. | ई. | ई. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १३ ते १७ फेब्रुवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमान साधारण राहील. दिनांक १३ ते १७ फेब्रुवारी २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेग ४ ते ६ कि. मी. प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | रोप अवस्था | • उन्हाळी भात पिकासाठी पाण्याचे नियोजन करावे. पुनर्लागवडीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत शेतात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें. मी. ठेवावी जेणेकरुन तणांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल. |
| भुईमुग | फुलोरा | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. त्याचप्रमाणे लागवडीनंतर ४५ - ६० दिवसांनी पिकावर रिकामे पिंप फिरवावे जेणेकरुन जमिनीत घुसणाऱ्या आऱ्यांची आणि शेंगाची संख्या वाढण्यास मदत होईल. |
| कडधान्ये पिके | शेंगा अवस्था | • काढणीस तयार झालेल्या कडधान्य पिकांची काढणी सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी करून उन्हात व्यवस्थित वाळवावे. |
| आंबा | मोहोर व फलधारणा अवस्था | • सध्या आंबा पिकामध्ये मोहोर फुटण्याची व वाटाण्याच्या आकाराची फळे येण्याची अवस्था असून त्यावर तुडतुड्याचा आणि करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम + करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• हवामान अंदाजानुसार तापमानात वाढ संभवत असल्याने आंब्याची फळगळ होण्याची शक्यता असल्याने फळगळ कमी करण्यासाठी फलधारणा झाल्यावर चौथ्या फवारणीपासून ते सहाव्या फवारणीपर्यंत फवारणीच्या द्रावणात २ टक्के युरिया (२०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून) मिसळून फवारणी करावी. किंवा आंब्यास मोहोर येऊन फळे वाटणा, गोठी व अंडाकृती असताना १ टक्का पोटशियम नायट्रेटच्या तीन वेळा फवारणी करावी.<br>**सूचना:** युरिया पाण्यात पूर्णपणे मिसळल्यानंतर त्यात कीटकनाशक मिसळावे.<br>• फळगळ कमी करण्यासाठी फलधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाळ्या दयाव्यात.<br>• फळ वाटणा आकारचे असताना फळाचा आकार, फळाचे वजन फळामधील साका आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० आकाराची पेपर पिशवी लावावी. |
| नारळ | - | • नारळाच्या पाच वर्षावरील माडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश असा खताचा तिसरा हप्ता दयावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. |
| फुलपिके | फुल अवस्था | • ॲस्टर व झेंडू पिकामध्ये कळ्या धरू लागल्यापासून ते फुले काढणीपर्यंत पाण्याचा ताण पडू देवू नये, अन्यथा फुल उत्पादनावर परिणाम होवू शकतो. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फळधारणा | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भेंडी, वांगी, टोमेटो, मिरची इ. पिकांना भर दयावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• काढणीस तयार झालेल्या भाजीपाला पिकांची काढणी करावी<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना तापसरी किंवा गोचीडाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास पशुवैद्यकच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**